# ''प्रेस नोट''

## शिवडी पोलीस ठाणे कडून कुजलेला व चेहरा विच्छीन्न अवस्थेतील अनोळखी महिलेच्या खुनाच्या गुन्हयातील आरोपीत इसमास अटक केले बाबत................

शिवडी पोलीस ठाणे हद्दीत बी पी सी एल कंपनीचे पाठीमागे, टिकटॉक पाईन्ट, शिवडी,मुंबई या ठिकाणी गर्द झाडीमध्ये दिनांक २२/०१/२०२३ रोजी सकाळी ०९:३० वा. एका अनोळखी महिलेचा कुजलेल्या अवस्थेत चेहरा विच्छीन्न केलेल्या स्थितीत मृतदेह मिळून आला. सदर घटनेबाबत अपमृत्यु क्रमांक ९/२०२४, कलम १७४ फौ.प.सं प्रमाणे नोंद घेण्यात येवून तपास सुरु करण्यात आला. सदर अनोळखी महिलेच्या मृतदेहाचे शवविच्छेदनानंतर तिच्या मृत्युचे कारण **''HEAD INJURY''** असल्याचे निदान के.ई.एम रुग्णालयाचे वैदयकिय अधिकारी यांनी केले. यावरुन सदर अनोळखी महिलेचा मृत्यु हा अज्ञात इसमाने तिला जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करणे करीता तिचा चेहरा जाणिवपुर्वक नष्ट केलेला आहे. सदर अपराधीक कृतीबाबत शिवडी पोलीस ठाणे येथे अज्ञात इसमाचे विरोधात दिनांक २४/०१/२४ रोजी गु.र.क ३६/२०२४, कलम ३०२,२०१ भा.द.वि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

नमूद गुन्हयाचे घटनास्थळ हे दिवसा कमी वर्दळीचे, रात्रीचे वेळी निर्मनष्य असे असून मयत महिलेचा मृतदेह हा कुजलेल्या, चेहरा विच्छन्न अवस्थेत असल्याने तिला ओळखणे व गुन्हा उघडकीस आणणे हे आव्हानात्मक होते. मा. वरिष्ठांच्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे शिवडी , वडाळा व यलोगेट पोलीस ठाणेची एकूण ८ पोलीस पथके तयार करण्यात येवून त्याचे मार्फतीने मयत महिलेचे ओळख पटविणे करीता एकूण १६२ हरविलेल्या महिलांची तपासणी करण्यात आली, मयत महिलेच्या अंगावर मिळून आलेला ऐवजा प्रमाणे शोध प्रत्रिका तयार करण्यात येवून दक्षिण प्रादेशिक विभाग, मध्य प्रादेशिक विभाग व पुर्व प्रादेशिक विभातील सर्व पोलीस ठाणेच्या हद्दीत एकूण १,००० शोध प्रत्रिका चिटकविण्यात येवून व माहिती देवून प्रसिध्दी देण्यात आली होती. सातत्याने तपास करून प्राप्त माहितीच्या आधारे मयत महिला ही वारंगणा किंवा रोडसाईड असण्याची शक्यता असल्याने वेश्या व्यवसाय करणाऱ्या व रोडवर राहणाऱ्या एकूण २०० पेक्षा अधिक महिलांची भेट घेवून त्यांना मयत महिलेची व तिचे जवळील ऐवजाची माहिती व शोध प्रत्रिकेचे वाटप करण्यात येवून मयत महिलेची ओळख पटविणे करीता कसोशिने प्रयत्न करण्यात येत होते.

तपासात मिळालेल्या गोपनीय माहिती व साक्षिदारांच्या विचारपूस मधून तसेच मिळालेल्या तांत्रिक माहितीच्या आधारे मुंबई सेन्ट्रल परीसरातून सदरची मयत महिला हिचे नाव **श्रीमती.सपना सतिश बातम, वय- ४० वर्षे** असल्याचा शोध लावून तिची मुलगी सोनी हिचे मार्फतीने तिची ओळख निश्चित करण्यात आली. तसेच संशयीत इसम नामे **शेहजादा उर्फ रमजान शफि शेख, वय- ३७ वर्षे, पत्ता :- बरकतअली दर्गा रोड, डोंगराचे वर मुंबई महानगर पालीका कार्यालयाचे जवळ, वडाळा (पुर्व), मुंबई- ३७** याने मयत महिला हिला दारू पाजण्याचे बहाण्याने मोटार स्कुटर वर बसवून गुन्हयाचे घटनास्थळी आणले व त्यामध्ये झालेल्या भांडणात तिला दगडाने ठेचून जिवे ठार मारले. तसेच तिची ओळख पटू नये याकरीता तिचा चेहरा नष्ट केला व मयत महिलेचे पुर्ण शरीर हे प्लास्टिकने झाकून त्यावर लाकडी काडया व प्लायवूड ठेवून गुन्हयाचे घटनास्थळावरुन पळून गेल्याचे आरोपीताने चौकशीत सांगितले. गुन्हयाच्या हेतूबाबत आरोपीकडे विचारपूस करण्यात येत आहे.

नमूदच्या गुन्हयात अनोळखी मयत महिलेच्या बाबत कोणतीही स्पष्ट अशी माहिती नसताना, प्रत्यक्ष गुन्हा घडल्याचे बाबत माहिती सांगणारे कोणीही उपलब्ध नसताना उपलब्ध माहितीच्या आधारे सातत्याने प्रयत्न करून आरोपीत इसमास अटक करण्यात यश प्राप्त केले आहे.

सदरची कामगीरी मा.सत्यनारायण चौधरी, सह पोलीस आयुक्त( का व सु), मुंबई, मा. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग, मुंबई, मा.श्री.संजय लाटकर, पोलीस उप आयुक्त, बंदर परिमंडळ मुंबई, मा. श्री.विजय भिसे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वडाळा विभाग, मुंबई, मा. श्री.रोहीत खोत, व.पो.नि, शिवडी पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विशाल चंदनशिवे, श्री.शिवाजी पासलकर, सचिन माने, स.पो.नि.सागर काळेकर, स्नेहलसिंग खुळे, श्री.विश्राम मदने, पोलीस उप निरीक्षक शिव धुमाळ, रनावरे, वाल्मीक महाजन, स.पो.उप.नि सुनिल कळविकट्टी, पो.हवा.क ३४५१६/गायकवाड, पो.हवा.क.९७०७५२/कदम, पो.हवा.क ००४९३/ यादव, पो.हवा.क ०६०११०६/बागवाण, पो.हवा.क ०६१६८३/कासार, पो.हवा.क ०४०९४१/घाडगे, पो.शि.क ०७१५१७/साळेकर, पो. शि.क ०९३२१२/धायगुड, पो.शि.क ११३२०४/साळवे पो.शि.क ०९३३८०/जमादार, पो.शि.क ०९०३५२/शेख, पो. शि.क १११६६१/जाधव, पो.शि.क १११६२७/आठरे, पो.शि.क १४०५८५/माळोदे, पो.शि.क १४०५४३/लाड, पो.शि. क १३०२७६/पाटील, पो.शि.क .०९१९३६/गलांडे, पो.शि.क ०९१९३६/जगताप, पो.शि.क १३००४४/काटकर, पो. शि.क १४०२२३/पाटोळे, पो.शि.क ११०५०८/मखरे, पो.शि.क ११३४१४/बाबर, व पो.शि.क ११२९७८/खारे , पो. शि.क १४०५९५/बडे यांनी पार पाडलेली आहे.